नगर परिषदा/नगर पंचायती
सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७
प्रत्येक मतदान केंद्रावर ठेवावयाच्या मतदारांच्या
संख्येबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/प्र.क्र. २९/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०१६.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

**विषय:- नगर परिषदा/नगर पंचायती सार्वत्रिक निवडणूक- २०१६-१७**
**प्रत्येक मतदान केंद्रावर ठेवावयाच्या मतदारांच्या संख्येबाबत**

महोदय,

आपल्याला माहितच आहे की, डिसेंबर-२०१६ ते फेब्रुवारी-२०१७ या कालावधीत मुदती संपणाऱ्या नगर परिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्त यांची आहे.

२. राज्य शासनाने "महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक ९)", दिनांक १९/०५/२०१६ अन्वये नगर परिषदांमध्ये (नगर पंचायती वगळून) एकसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व तसेच नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे.

३. नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये मागील दोन निवडणुकांमध्ये मतदान केंद्रावर खालीलप्रमाणे मतदारांची संख्या निश्चित करण्यात आली होती :-

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०११ | ६०० मतदार प्रती मतदान केंद्र | बहुसदस्यीय पध्दतीमुळे प्रत्येक मतदारास सरासरी ४ मते |
| (ब) | लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०१४ | १२०० ते १४०० मतदार प्रती मतदान केंद्र | प्रत्येक मतदारास एक मत |

४. वरील बाबी (बहुसदस्यीय प्रभाग पध्दती व नगराध्यक्षांची थेट निवडणूक) लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकारी यांना एका मतदान केंद्रावर किती मतदार असावेत, याची शहानिशा करण्यास सूचित केले होते. त्यांच्याकडून प्राप्त झालेले अहवाल व इतर सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोगाकडून सार्वत्रिक निवडणुका-२०१६-१७ करिता खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत:-

(i) नगर परिषदांकरिता -

१ नगराध्यक्ष व २-३ सदस्यांसाठी - ८०० ते ८५० मतदार
(प्रत्येक मतदारास सरासरी ३ मते) प्रती मतदान केंद्र

(ii) नगर पंचायतीकरिता -

प्रत्येक मतदारास १ मत - १२०० ते १४०० मतदार
प्रती मतदान केंद्र

५. वरील सार्वत्रिक निवडणुकांनंतर पुढील प्रत्येक निवडणुकीमध्ये (सार्वत्रिक / पोट) ज्या ठिकाणी मतदारास सरासरी ३ मते द्यावयाची आहेत तेथे ८०० ते ८५० मतदार प्रती मतदान केंद्र व ज्या ठिकाणी एकच मत द्यावयाचे आहे तेथे १२०० ते १४०० मतदार प्रती मतदान केंद्र हा निकष निश्चित करून देण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

F:\राज्य निवडणूक आयुक्तांनी डिक्टेट केलेली पत्र\नप- जिपपंस- मनपा निवडणूक-२०१६-१७.docx